दैनिक **रायगड नगरी**
अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १४० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१३ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# रायगड जिल्ह्यात डेल्टा प्लस विषाणूचे आढळले दोन रुग्ण


## नागोठण्यातील एक व्यक्तीचा मृत्यू डेल्टा पल्स विषाणूमुळे

**दै.रायगड नगरी । वाकण**

**संपूर्ण रायगड जिल्ह्यात कोरोनाच्या दुस-या लाटेचे प्रमाण काहीसे कमी झालेले आहे. असे असतांनाच रायगड जिल्ह्यात कोरोनामुळे मृत्यूच्या पार्श्वभूमीवर मृत रुग्णांची करण्यात आलेल्या तपासणीत जिल्ह्यातील दोन रुग्णांचे मृत्यू कोरोनाचे नवे रुप असलेल्या डेल्टा प्लस विषाणूची लागण होऊन झाल्याचे आढळून आले आहे. यातील एक मृत्यू उरण येथील तर दुसरा मृत्यू नागोठण्यातील व्यक्तीचा असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाकडून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे खळबळ निर्माण झाली आहे.**

कोरोनाच्या दुस-या लाटेत नागोठण्यातील अनेकांना आपला प्राण गमवावा लागला होता. नागोठण्यातील याच मृतांपैकी नुकत्याच झालेल्या एका मृताचा कोरोना चाचणी अहवाल प्राप्त झाला असून हा मृत्यू डेल्टा प्लस विषाणूमुळेच झाल्याचे निदान झाले आहे. त्यामुळे नागोठण्यातील आरोग्य यंत्रणा कामाला लागली आहे. या मृत व्यक्तिच्या संपर्कात आलेल्या सर्व व्यक्तींची तपासणी करण्यात येणार असल्याचे आरोग्य यंत्रणेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर आता महाराष्ट्रासह



देशभरात पुन्हा एकदा कोरोनाच्या नवीन रूपाने, डेल्टा प्लस व्हेरियंटने चिंता वाढविली आहे. डेल्टा प्लस हा व्हेरियंट अधिक संसर्गजन्य आहे. हा विषाणू फुफ्फुसांच्या पेशींच्या रिसेप्टरला अधिक घट्टपणे चिपकून राहण्यास सक्षम आहे. ज्यामुळे फुफ्फुसांना लवकर प्रभाव होण्याची शक्यता आहे. हा व्हेरियंट आपल्या प्रतिकारशक्तीस चकवा देण्यासही अधिक सक्षम असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ सांगत आहेत.

यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्याशी संपर्क साधला असता नागोठण्यातील एक व्यक्तीचा मृत्यू डेल्टा प्लस विषाणूमुळे झाल्याच्या वृत्ताला त्यांनी दुजोरा दिला आहे. डेल्टा प्लस विषाणूचा नागोठण्यात शिरकाव झाल्याने नागरिकांनी कोविड १९ संदर्भात शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करावे असे आवाहन आरोग्य यंत्रणेकडून करण्यात आले आहे.

# मुरुडचे तहसिलदार गमन गावीत लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । मुरुड**

कुळ वहिवाट कायद्याच्या जमिन फेरफार करण्यासंदर्भात १५ हजारांची लाच घेताना मुरुडचे तहसिलदार गमन गावीत यांच्यासह दोन कर्मचाऱ्यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबतचे वृत्त असे की तक्रारदाराला आपल्या जमीनीच्या विक्रीसाठी त्यावर असलेले कुळ वहिवाट ३२ ग प्रमाणपत्रासाठी मुरुड तहसिलदार तथा शेतजमिन न्यायधिकार प्राधिकरणाकडे मागणी करण्यात आली होती. तक्रारदाराकडे मुरुडचे तहसिलदार गमन गावीत यांनी १५ हजार रुपयांची लाच मागितली होती. याबाबत नवीमुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आली होती.

नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक शिवराज बेंद्रे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचून बुधवारी सायंकाळी सहाच्या दरम्यान तक्रारदाराकडून १५ हजार रुपयांची लाच घेताना तहसिलदार गमन गावीत यांच्यासह कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडले. सदर प्रकरणाबाबत गुन्हा नोंदविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

# राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या जन्मानंतर महाराष्ट्रात जातीचा मुद्दा मोठा झाला : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**



लोकसंख्या वाढीसाठी राजकारणीच जबाबदार आहेत. जोपर्यंत आपण देशाच्या लोकसंख्येवर विचार करत नाही तोपर्यंत हे प्रश्न कधीच सुटणार नाही. राजकीय पक्ष कोणतेही असले तरी काही गोष्टींवर एकमताने विचार करणयाची गरज आहे, असं स्पष्ट मत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी व्यक्त केलं आहे. 'एबीपी माझा'च्या कार्यक्रमात ते बोलत होते.

देशाच्या विकासात लोकसंख्या एक महत्वाचा अडथळा ठरत असून ती नियंत्रणात आणण्याची गरज असल्याचं राज ठाकरे यांनी सांगितलं. देशातील जनतेला कमी मुलं झाल्यास फायदे देणार आहात सांगत प्रोत्साहन पण द्यावं लागेल असं सांगताना राज ठाकरेंनी याकडे आपण हिंदू, मुस्लिम असं पाहू नये असंही आवाहन केलं. दारु पिऊन गाडी चालवल्यावर सक्ती करता. जेलमध्ये टाकता किंवा दंड घेता. यामुळे दारु पिऊन गाडी चालवणाऱ्यांची संख्या कमी झाली. चांगल्या गोष्टींसाठी सक्ती करावी लागते. लोकशाही काही गोष्टींसाठी मारक ठरत असेल तर काही निर्णय घ्यावे लागतील. काही विषयांमध्ये केली नाही तर हे प्रश्न कधीच सुटणार नाही, असं राज ठाकरेंनी यावेळी सांगितलं.

महाराष्ट्रामध्ये जाती पहिल्यापासून होत्या. प्रत्येकाला आपल्या जातीबद्दल एक अभिमान होता. तसेच जातीवरती मतदानही व्हायचं आणि ते आजही होतं. मला सध्या सध्या महाराष्ट्रामध्ये असं दिसतं की, लोकांना जातीबद्दल अभिमान हा आहेच, पण दूसऱ्याच्या जातीबद्दलचा द्वेष वाढत गेला आहे. हे महाराष्ट्राच्या एकूण सांस्कृतीला डाग लावणार चित्र आहे, असं राज ठाकरे यांनी सांगितलं.

प्रत्येकाला आपल्या जातीबद्दल .../२

## संक्षिप्त...

### शरद पवार यांच्या आवाजाची नक्कल करून पैश्यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पुणे**

राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा आवाजात बोलून व्यवहारात पैश्यांची मागणी केल्याचं समोर आलंय. यामुळं खळबळ उडाली आहे. याप्रकरणी प्रताप खंडेभराड यांच्या फिर्यादीवरुन पुण्याच्या चाकण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी धीरज पठारे गुरव नामक व्यक्तीशी शरद पवारांच्या आवाजात बोलला आहे.

एक कोटींहून अधिकची रक्कम प्रताप यांना धीरज यांनी २०१४ मध्ये दिली. त्यात व्याज लाऊन साधारण पाच कोटींच्यावर रक्कम मागत होता. त्यापोटी त्यांनी तेरा एकर जमीनही घेतली. तरीही तो पैशाची मागणी करत राहिला. ते देत नसल्याने शेवटी त्याने शरद पवारांच्या आवाजाचा आधार घेतला. यासाठी सॉफ्टवेअरचा आधार घेत पवारांच्या मुंबई येथील लँडलाईन नंबरवरून कॉल केल्याचं दाखवलं आणि गुरव करवी त्यांचा आवाज काढून पैशांचीही मागणी केली. याप्रकरणी एक गुन्हा मुंबईत तर दुसरा गुन्हा चाकणमध्ये दाखल झाला आहे. अशी माहिती पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी दिली. गुन्ह्यातील तिघांना मुंबई पोलिसांनी अटक केलेली आहे. त्यांची पोलीस कोठडी संपल्यानंतर पिंपरी चिंचवड पोलीस त्यांना ताब्यात घेणार आहे.

# कोकणातील बांधवांना आवश्यक ती सर्व मदत पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करू : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकणातील आपल्या पूरग्रस्त बांधवांसाठी पहिल्या दिवशी पासून स्वच्छतेसाठी आवश्यक त्या मशिनरी, पाण्याचे टँकर सेवा देण्याच्या सोबतच शेतकरी कामगार पक्ष आणि माझ्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत. आज पुन्हा आवश्यक त्या वस्तूंची सेवा खेड, चिपळूण येथील शहरी आणि ग्रामीण भागात देण्यात आली. यावेळी चिपळून- संगमेश्वरचे आमदार शेखर निकम यांचे चिरंजीव .अनिरुद्ध शेखर निकम आणि खेड येथे सत्तू कदम, राठोड सर उपस्थित होते. याप्रसंगी देवेंद्र पाटील, मंगेश अपराज, सुनिल पाटील स्वतः त्या ठिकाणी उपस्थित होते. यापुढेही माझ्या कोकणातील बांधवांना आवश्यक ती सर्व मदत पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करू असे पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सांगितले आहे.



# खेळखंडोबा राज्य सरकार शिक्षणाच्या मुळावर : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



राज्यातील शिक्षणाचा खेळखंडोबा करून विद्यार्थी व पालकांचा जीव टांगणीवर ठेवणाऱ्या ठाकरे सरकारचा अकरावी प्रवेशाच्या घोळात आता शिष्यवृत्ती परीक्षेतील गोंधळाची भर घातली आहे असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता संपुष्टात आणण्याचा चंग आघाडी सरकारने बांधला आहे, अशी टीका भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना केली. शिक्षण खाते काँग्रेसकडे आहे म्हणून गंमत पाहात स्वस्थ न बसता आता मुख्यमंत्र्यांनी हा सावळा गोंधळ निस्तरला पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

१७ ऑगस्टपासून शाळा सुरू होणार असा जीआर निघाला होता त्याला स्थगिती दिली, यावरून या सरकारची धरसोड वृत्ती पुन्हा दिसली आहे. राज्याच्या शिक्षण खात्याने विद्यार्थ्यांचे हित खुंटीवर टांगले असून सातत्याने शिक्षणसम्राटांच्या हिताचीच भूमिका घेतली आहे. शाळा सुरू करण्यापासून परीक्षांपर्यंत आणि प्रवेशापासून शिकवण्यांपर्यंत प्रत्येक मुद्द्यावर न्यायालयाने चपराक लगावल्याखेरील शिक्षण खात्याचा गाडा पुढे सरकतच नाही. दहावी-बारावी परीक्षांचा घोळ सरकारच्या धोरणलकव्यामुळेच वाढला असून आता प्रवेश प्रक्रियेवर चाचपडणे सुरू झाल्याने अकरावीच्या शैक्षणिक वर्षाचीही वाताहत होण्याची भीती आहे, असे ते म्हणाले. राज्यभरातील पाचवी-आठवीचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा देणार असताना मुंबई महापालिकेच्या गरीब होतकरू मुलांना मात्र या परीक्षेपासून वंचित ठेवण्याचा चंग सरकारच्या आशीर्वादाने पालिकेने बांधला आहे, असा आरोप करून ते म्हणाले की शिक्षण खात्याच्या कारभाराचे सातत्याने वाभाडे निघत असल्याने राज्याच्या शिक्षणक्षेत्राचा प्रवास उलट्या दिशेने सुरू झाला असून, विद्यार्थी-पालक, हवालदील आणि सरकार .../२

# संभाजीराजेंना संसदेत बोलण्याची संधी नाकारण्याचा प्रयत्न दुर्दैवी : अशोक चव्हाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**



आरक्षणाची ५० टक्के मर्यादा शिथिल करण्याबाबत महाराष्ट्रातील भाजप खासदारांनी संसदेत बाळगलेल्या मौनातून मराठा आरक्षणाबाबत त्यांच्या दुटप्पी भूमिकेचा पर्दाफाश झाल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या विधानांवर प्रतिक्रिया व्यक्त करताना ते बोलत होते. चव्हाण म्हणाले की, भाजपच्या या दोन्ही नेत्यांना आता मराठा आरक्षणावर बोलण्याचा नैतिक अधिकार राहिलेला नाही. १०२ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्यांना अधिकार राहिलेले नसताना तत्कालीन भाजप सरकारने मराठा आरक्षण दिले, हे सिद्ध झाले आहे.

शिवाय ती चूक आता दुरुस्त होत असताना ५० टक्के आरक्षण मर्यादा शिथिल करण्याबाबत महाराष्ट्रातील भाजप खासदारांनी चकार शब्दही काढला नाही. खा. संभाजी राजे यांनी याबाबत राज्यसभेत बोलण्यासाठी वेळ मागूनही दुर्दैवाने त्यांना वेळ देण्यात आली नाही. शेवटी विरोधी पक्ष आक्रमक झाले व त्यानंतर त्यांना बोलण्याची संधी देण्यात आली. या साऱ्या प्रकारातून मराठा .../२

# निर्बंधांमुळे पिचलेल्या व्यापाऱ्यांनी कामोठ्यामध्ये केला आक्रोश

## नगरसेवक विकास घरत यांच्या नेतृत्वाखाली केले दुकाने खोलो आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सामान्य जनतेसाठी सामान्य बाब होऊन राहिला आहे. निर्बंधांना फाट्यावर मारत जनता कुठे ना कुठे तरी आपापले इप्सित साधून घेत आहे. एव्हाना कोरोनाविषाणू प्रादुर्भाव हा केवळ शासकीय दप्तरी नोंद करण्याइतपत विषय शिल्लक राहिलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, आणि ठाणे महानगरपालिका याठिकाणी निर्बंध हटविल्यानंतर जनमानस सुरळीत झाल्याचे दिसून येते. या पार्श्व भूमीवर केवळ पनवेल महानगरपालिका लेवल ३ मध्ये असल्याकारणाने जाचक निर्बंधांना सामोऱ्या जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्यात आक्रोश दिसून आला.

लॉक डाऊन मुळे पिचून गेलेल्या व्यापाऱ्यांनी कामोठे,भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक विकास घरत यांच्याशी संपर्क साधला. कामोठे विभागात दुकाने सिल करण्याचा धडाका व्यापाऱ्यांच्या मनात धास्ती निर्माण करत आहे. भिक नको पण कुत्रे आवर! अशा मानसिकतेत वावरणाऱ्या व्यापाऱ्यांनी विकास घरत यांना या अडचणीतून सोडविण्याचे अर्ज केले. विकास घरत यांनी व्यापार्यांतचे शिष्टमंडळ घेऊन थेट आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली. त्यांना व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी बाबत अवगत केले. आयुक्त महोदयांनी दोन दिवसात उच्च दरबारी हा विषय कळवून व्यापाऱ्यांना सकारात्मक तोडगा काढून देण्याचे आश्वासन देखील दिले. परंतु गेले १७ महिने कोरोना विषाणू मुळे प्रचंड नुकसान सहन कराव्या लागलेल्या व्यापाऱ्यांची मानसीकता एव्हाना प्रशासनाची आश्वासने ऐकून घेण्याच्या तयारीत नव्हती. कुठल्याही परिस्थितीत मुंबई,ठाणे,पुणे आणि नवी मुंबई प्रमाणे आम्हीदेखील दुकाने आठ वाजेपर्यंत सुरू ठेवणार अशी त्यांची ठाम भूमिका होती. व्यापाऱ्यांनी प्रत्येक सेक्टर मध्ये .../२



# महाविकास आघाडीच्या मंत्र्यांवरही ट्विटरकडून कारवाईचा बडगा

## बाळासाहेब थोरात यांचे अकाऊंट ट्विटरकडून लॉक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दिल्लीतील बलात्कार पीडितेचा कुटुंबीयांसोबतचा फोटो शेअर केल्याने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर ट्विटरने कारवाई केली होती. दरम्यान, ट्विटरचीकाँग्रेसवरील कठोर कारवाई सुरूच ठेवली आहे. आज सकाळी ट्विटरने काँग्रेसचे ट्विटर अकाऊंट बंद केल्यानंतर आता महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचे ट्विटर अकाऊंट लॉक केले आहे. ट्विटरकडून करण्यात आलेल्या या कारवाईमुळे काँग्रेसकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

ट्विटरच्या नियमांचा भंग केल्या प्रकरणी तुमच्यावर कारवाई करण्यात येत आहे, असे बाळासाहेब थोरात यांचे ट्विटर अकाऊंट लॉक करताना ट्विटरने सांगितले आहे. दरम्यान, काँग्रेस आणि ट्विटर यांच्यातील संघर्ष वाढत चालला आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांचं अकाऊंट बंद केल्यानंतर आता ट्विटरनं काँग्रेसचं अकाऊंट बंद केलं आहे. ट्विटर अकाऊंट बंद करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे. आमचा लढा सुरूच राहील, असा निर्धार काँग्रेसकडून व्यक्त करण्यात आला आहे.



ट्विटर अकाऊंट बंद करण्यात आल्याची माहिती काँग्रेसनं फेसबुकच्या माध्यमातून दिली. 'आमच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आलं, त्यावेळीही आम्ही घाबरलो नाही. मग ट्विटर अकाऊंट बंद केल्यानं का घाबरू? आम्ही काँग्रेस आहोत. जनतेचा संदेश आहोत. आम्ही लढत आहोत. लढत राहू,' असा निश्चय काँग्रेसनं केला आहे. बलात्कार पीडित मुलीला न्याय देण्यासाठी आवाज उठवणं अपराध असेल, तर हा अपराध आम्ही शंभरवेळा करू. जय हिंद, .../२

# रेशन दुकानदारांना न्याय मिळवून देणे हे आमचे प्रथम कर्तव्य : शिरीष घरत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील रास्त धान्य हे गोरगरीब जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम रेशन दुकानदार नियमितपणे करीत असतात, मात्र त्यांना पुरविले जाणाऱ्या धान्याच्या गोण्यांमध्ये प्रत्येकी ५ ते १० किलोची घट येत असल्याने रेशन दुकानदारांना याचा मेळ ठेवता येणे शक्य होत नव्हते. वारंवार तक्रारी करूनही पनवेल तहसील कार्यालय तसेच संबंधित पुरवठा अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून रेशन दुकानदारांना त्रास देण्याचा पवित्रा अवलंबला होता. सदर बाब शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्याकडे पोहोचल्यानंतर त्यांनी तात्काळ या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पदाधिकाऱ्यांना सोबत घेत आपला मोर्चा पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांच्याकडे वळवून याबाबत सखोल चर्चा केली, तसेच नुकसानीला सामोरे जाणाऱ्या रेशन दुकानदारांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू आणि हे आम्हा शिवसैनिकांचे कर्तव्यच आहे असे आश्वासित केले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी सुद्धा उपस्थित राहिले होते.



कधी काळी प्रतिष्ठा कमावलेला रेशन व्यवसाय आता डबघाईला आला असून, रेशन दुकाने चालविणे हत्ती पोसण्यासारखे झाले आहे. त्यामुळेच रेशन दुकाने बंद करण्याच्या निर्णयावर हे दुकानदार पोहोचले होते, मात्र गोरगरिबांचे नुकसान होवू नये या भावनेतून या दुकानदारांनी आपली दुकाने सुरू ठेवली आहेत. तालुक्यातील रेशन दुकानदारांनी पुरवठा विभागाकडे आपल्या तक्रारींचा पाढा नेहमीच वाचला आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाच्या अंमलबजावणीमुळे राज्यात सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कोट्यामध्ये मोठी कपात करण्यात आली. यामुळे रेशन दुकानदारांना दिला जाणारा धान्याचा कोटाही पूर्वीच्या तुलनेत खूपच कमी झाला आहे. परिणामी तुटपुंजे कमिशन आणि महागाईमुळे वाढता खर्च याची सांगड घालणेही रेशन दुकानदारांसाठी कसरतीचे ठरते आहे. केरोसिनचे वाटपही बंद करण्यात आले आहे. हमालीमुक्त धान्य मिळावे, केरोसिनचा कमी केलेला कोटा पूर्ववत करावा, आधारकार्डाचा तपशील गोळा करण्याचे काम रेशन दुकानदारांच्या माथी न मारता ते सरकारी यंत्रणेने करावे यासह अनेक मागण्यांसाठी रेशन दुकानदारांची संघटना सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करते आहे. मात्र, त्याला दाद दिली जात नसल्याने रेशन दुकानदारांमध्ये नाराजी आहे. या सर्व पार्श्वभूमीवर रेशन दुकानदारांनी आपली नाराजी पुरवठा अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली. रेशन दुकानदारांची ही व्यथा शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांना समजताच त्यांनी तात्काळ पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी यांची भेट घेवून यावर उचित निर्णय घेण्याचे आश्वासित केले.

यावेळी तहसीलदार विजय तळेकर यांनी रेशन दुकानदारांच्या समस्या आपण जाणून घेवून योग्य प्रकारे हाताळल्या जातील असे उपस्थितांना सांगितले. तसेच पुरवठा अधिकाऱ्यांकडून कोणत्या त्रुटी होत आहेत, याबाबतही आपण सखोलपणे चौकशी करू असा विश्वास त्यांनी यावेळी उपस्थितांच्या मनात निर्माण केला. मात्र जर तहसीलदार विजय तळेकर यांच्याकडून या घटनेचा गांभीर्याने छडा लावला गेला नाही तर आपण सरकारकडे स्वतः याचा पाठपुरावा करून रेशन दुकानदारांना न्याय मिळवून देवू, असे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सांगितले. यावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्यासह उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, पनवेल तालुका संघटक दीपक निकम, पनवेल विधानसभा संघटक तथा रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील, समन्वयक प्रदीप ठाकूर, उपमहानगरप्रमुख दीपक घरत, ज्येष्ठ पत्रकार सुनील पोतदार, रेशन दुकानदार संघटनेचे भालचंद्र ठाकूर, शशिकांत भगत आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, रेशन दुकानदार संघटनेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते.

# शरण संकुल चॅरिटेबल सोसायटी तर्फे पूरग्रस्तांना अत्यावश्यक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

महात्मा बसवेश्वरांच्या मानवतावादी विचारधारेवर आधारित असलेल्या नवीमुंबईतील 'शरण संकुल चॅरिटेबल सोसायटी' या लिंगायत समाजाच्या संस्थेने नेहमीप्रमाणे यावेळेलाही संकटकाळात अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांना सामाजिक बांधिलकी जपत मदत करण्याचा निश्चय केला. संस्थेचे विश्वस्त, कार्यकारी मंडळ आणि नवीमुंबईतील लिंगायत समाज एकत्र येत बाधित कुटुंबीयांना अत्यावश्यक साहित्य आणि वस्तूंचे वाटप करून छोटीशी मदत करायचे ठरवले. त्यानुसार, अतिवृष्टीने बाधित झालेल्या तीनशे पन्नास कुटुंबीयांना सोलापुरी चादर, टॉवेल, चटई, लहान मुलांसाठी टी शर्ट आणि हाप पॅन्ट या अत्यावश्यक कपड्यांचे वाटप करण्यासाठी किट बनवले.

महाड तालुक्यातील सवाद, कणगुले, बिरवाडी, कुंभारवाडा, वेताळवाडी, तांबाड भुवन, कुंभारआळी, विरेश्वरआळी या वाड्या वस्त्यांवर शरण संकुलच्या कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी प्रत्यक्षात जाऊन बाधित कुटुंबीयांना सदर अत्यावश्यक कपड्यांची किट देऊन त्यांची सेवा केली आणि त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

यावेळी अनेक ग्रामस्थांनी त्या महापुराचे भयंकर प्रसंग शरण संकुल चॅरिटेबल सोसायटीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांसमोर कथन केले. तत्पूर्वी, सवाद गावांतील महिलांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष जी. बी. रामलिंगय्या यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अतिवृष्टीने विस्कळीत झालेला सर्वांचा संसार लवकरात लवकर उभा राहो अशी प्रार्थना करण्यात आली. सर्वांना महात्मा बसवेश्वरांचे पुस्तके भेट देण्यात आली. सर्व ग्रामस्थांनी 'शरण संकुल चॅरिटेबल सोसायटी' या संस्थेने केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत संस्थेचे आभार मानले.



सर्व ग्रामस्थांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सहकार्य करत संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष जी. बी. रामलिंगय्या, उपाध्यक्ष जगदीशप्पा एच. गौडर, सहखजिनदार सुनिल पाटील, सहसचिव आनंद गवी, कमिटी सदस्य प्रकाश अवरनळ्ळी आणि वैजिनाथ आग्रे उपस्थित होते. यावेळी तेथील स्थानिक युवा सामाजिक कार्यकर्ते अनंत महाडकर, सतीश ऐलणकर, अक्षय गुरबडकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# तळा येथे जागतिक आदिवासी दिन साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुक्यातील आदिवासी बांधवांनी ९ऑगस्ट क्रांती दिनी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांची पुण्यतिथी व जागतिक आदिवासी दिन शेनाटे आदिवासी वाडी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हुतात्मा नांग्या कातकरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

हुतात्मा नाग्या कातकरी यांनी स्वातंत्र्यपुर्व काळात अतिशय मोलाची कामगिरी बजावली होती. २५सप्टेंबर१९३० साली ब्रिटिश काळात चिरनेर अक्काबाई जंगलात स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेऊन इंग्रजांना सळो कि पळो करून सोडले. पण या चळवळीत इंग्रजांकडून हौताम्य आले. ९ ऑगस्ट १९४२ साली महात्मा गांधीनी भारत छोडो आंदोलन केले. त्यात अनेक महान व्यक्ती नी सहभागी होऊन आंदोलन तीव्र केले त्यात अनेक जण हौताम्य आले. त्यांचे मोठे योगदान आहे. त्याकाळात जगातील वेगवेगळ्या देशातील आदिवासी समाज उपेक्षित जीवन जगत आहेत.

गरीबी, अज्ञान, आरोग्य सुविधा, बेरोजगारी, मजुरी अशा अनेक समस्यांनी त्रासलेला होता या विळख्यातून बाहेर पडणे अस्पष्ट होते या जागतिक दिनाची सुरुवात ९ ऑगस्ट १९९५ साली संयुक्त राष्ट्र संघाने आदिवासी समाजाच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टिकोनातून जागतिक आदिवासी दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने तालुका उपाध्यक्ष संघटक परशुराम चंदर पवार यांनी सांगितले. अध्यक्ष गोविंद पवार सचिव राजेंद्र जाधव यांनी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला तालुक्यातील आदिवासी समाज बांधव महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या जन्मानंतर महाराष्ट्रात जातीचा मुद्दा मोठा झाला : राज ठाकरे

अभिमान असतो. मात्र दूसऱ्याच्या जातीबद्दल द्वेष हा वाटणं, हे कधी महाराष्ट्रात नव्हतं. हे गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरु झालं. जातीचा मुद्दा त्यांच्या त्यांच्या नेत्यांच्या ओळखीचा भाग झाला आहे. महाराष्ट्रात जातीचा मुद्दा हा सर्वांथाने मोठा झाला असेल, तो म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जन्मानंतर. कोण जेम्स लेन, कसलं पुस्तक लिहिलं? तो काय जॉर्ज बर्नार्ड शॉ होता. बरं तो आता कोण आहे आणि कुठे आहे? त्या सगळ्या वातावरणात मराठा समाजाच्या मुलांना, मुलींना, हे कोणी लिहिले तर ब्राम्हणांनी लिहिले मग माळी समाज मग इतर समाज हे सगळं रचलेलं आहे, असं राज ठाकरे यांनी सांगितलं.

आजही निवडणुकांमध्ये विषय बदललेले नाहीत. आजही चांगले रस्ते, पाणी, वीज, शिक्षण देऊ असं सांगितलं जातं. पण मग आपण नक्की प्रगती कुठून गेली, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. प्रगती आपण नक्की केली आहे. पण याचा अर्थ रस्ते बांधणं, पूल बांधणं, हातात मोबाइल येणं याला प्रगती मानत नाही. देश म्हणून विचार करताना काही वैचारिक प्रगती झाली का? आपल्या देशात प्रगतीच्या व्याख्या काय आहे, असा सवालही राज ठाकरेंनी यावेळी उपस्थित केला.

## खेळखंडोबा राज्य सरकार शिक्षणाच्या मुळावर : आ.प्रशांत ठाकूर

दिशाहीन असे चित्र निर्माण झाले आहे. सरकार विद्यार्थ्यांच्या भवितव्याकडे साफ दुर्लक्ष करत असून अकरावी प्रवेशातील दिरंगाईतून हे स्पष्ट झाले आहे. कोणाच्या तरी फायद्यासाठी सीईटी घेण्याच्या हेतूला न्यायालयाच्या मार्फत लगाम घातली गेल्यामुळे प्रवेश प्रक्रिया लांबवून त्याची शिक्षा विद्यार्थ्यांना देऊ नये असेही ते म्हणाले. शिक्षण शुल्क १५ टक्क्यांनी कमी करण्याच्या आदेशास शिक्षणसंस्था जुमानत नाहीत, उलट सरकारवरच दबाव टाकून माघार घेण्यास भाग पाडतात, यावरून ठाकरे सरकारची हतबलताही स्पष्ट झाली आहे, असा आरोप त्यांनी केला.

अगोदर दहावीच्या परीक्षेबाबत गोंधळ वाढवून सरकारने विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण केले. ती परीक्षा वेळेवर घेतली असती, तर अकरावी प्रवेशाचा घोळ झालाच नसता. आता न्यायालयाने चपराक लगावल्याने सीईटी रद्द झाली आहे. या खेळात विद्यार्थ्यांवर अन्याय होत असताना मुख्यमंत्र्यांनी मात्र त्रयस्थपणे गंमत पाहात गप्प बसावे हे आश्चर्यकारक आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## संभाजीराजेंना संसदेत बोलण्याची संधी नाकारण्याचा प्रयत्न दुर्दैवी : अशोक चव्हाण

आरक्षणाबाबत भाजपची दुतोंडी भूमिका उघडी पडली आहे.

चंद्रकांत पाटील यांच्यावरही अशोक चव्हाण यांनी कडाडून टीका केली. भाजपचे प्रदेशाध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल व्यवस्थित वाचला पाहिजे. ५० टक्के आरक्षण मर्यादा हटवण्याची मागणी ही सबब नाही. याच आरक्षण मर्यादेमुळे मराठा आरक्षण फेटाळले गेले, ही वस्तुस्थिती आहे. शिवाय ही मागणी राज्याने आता केलेली नसून, मागील अनेक महिन्यांपासून आम्ही याबाबत सातत्याने बोलतो आहोत. संसदेत राज्यांचे मागासलेपण निश्चित करण्याचे अधिकार पुन्हा बहाल केले जात असताना त्याचवेळी ही मर्यादा देखील शिथिल करावी, अशी मागणी महाविकास आघाडीने लावून धरली. त्यासाठी काँग्रेसचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे, खा. अधिर रंजन चौधरी, खा.डॉ. अभिषेक मनू सिंघवी, खा. बाळूभाऊ धानोरकर, शिवसेनेचे खा. संजय राऊत, खा. विनायक राऊत, खा. प्रतापराव जाधव, राष्ट्रवादीच्या खा. सुप्रिया सुळे, खा. वंदना चव्हाण यांनी भक्कमपणे बाजू मांडली. मराठा आरक्षणाच्या संसदेतील लढ्याचे ते योद्धे आहे. पण खा. संभाजी राजे यांचा अपवाद वगळता भाजपचे इतर खासदार हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवून बसले होते. लोकसभा व राज्यसभेत काय घडले, ते उभ्या महाराष्ट्राने टीव्हीवर पाहिले. आता भाजपने मराठा समाजाची कितीही दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला तरी ते त्याला बळी पडणार नाहीत, असेही अशोक चव्हाण म्हणाले.

## महाविकास आघाडीच्या मंत्र्यांवरही ट्विटरकडून कारवाईचा बडगा

सत्यमेव जयते, अशी प्रतिक्रिया काँग्रेसनं दिली आहे. दिल्लीत एका नऊ वर्षीय मुलीवर बलात्कार झाल्याची घटना घडली. बलात्कारानंतर मुलीची हत्या करण्यात आली. या मुलीच्या कुटुंबीयांची राहुल गांधींनी भेट घेतली. या भेटीचा फोटो राहुल यांनी ट्विटरवरून शेअर केला होता. त्यामुळे ट्विटरनं राहुल यांचं अकाऊंट लॉक करण्यात आलं. राहुल गांधींसोबतच काँग्रेसच्या आणखी काही नेत्यांची अकाऊंट्सदेखील ट्विटरकडून बंद करण्यात आली आहेत. यामध्ये रणदीप सुरजेवाला, अजय माकन, सुष्मिता देव यांच्यासह अनेक नेत्यांचा समावेश आहे.

## निर्बंधांमुळे पिचलेल्या व्यापाऱ्यांनी कामोठ्यामध्ये केला आक्रोश

फिरून दुकाने उघडी ठेवा अशी मोहीम राबविली. त्यांच्याशी चर्चा करायचे सोडून मग्रूर अधिकाऱ्यांनी एक दुकान सील करण्याचा घाट घातला. ते समजतात कामोठे भाजप लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांचा जत्था त्या ठिकाणी जाऊन थडकला. मुद्देसूद अभ्यासावर वॉर्ड ऑफिसर चर्चा करण्यास तयार नव्हते. त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांना आणि उपायुक्त यांना पाचारण करण्यात आले. व्यापाऱ्यांनी उपायुक्त गुळवे यांच्याशी मुद्देसूद चर्चा करून अद्यापही पनवेल महानगरपालिका लेवल ३ मध्ये का आहे असा प्रश्न केला? अर्थातच यावर उपायुक्तांच्या कडे समाधानकारक उत्तर नव्हते. अखेरीस कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने नगरसेवक विकास घरत यांनी आगामी दोन दिवसात चार वाजता दुकाने बंद करू, परंतु या मुद्द्यावर आम्हास बैठक पाहिजे अशी भूमिका घेतली. त्यावर उपायुक्तांनी शुक्रवारी याबाबत सकारात्मक तोडगा काढण्यासाठी व्यापार्यांघचे शिष्टमंडळ,कामोठे भाजपाचे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात बैठक घडवून आणण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनात भारतीय जनता पार्टीच्या वतीने नगरसेवक विकास घरत, नगरसेवक विजय चिपळेकर,नगरसेवक हर्षवर्धन पाटील,कामोठे भाजपा युवा अध्यक्ष हॅप्पी सिंग, रवींद्र जोशी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते आणि व्यापारी बांधव सहभागी झाले होते.

---

मा.पांडे साहेब

अर्जदार तर्फे वकील
ॲड.निलम मुंगाजी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
क्रिमिनल एम.ए.नं.८०३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१३/०९/२०२१

श्री.शांताराम रामा भगत
वय : ६६ वर्षे, धंदा : शेती
रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वाजे,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.शिमगी रामा भगत, यांचा मृत्यू दि.०९/०८/२००५ रोजी मु.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी वयोवृद्ध असल्या कारणाने झालेला आहे. म्हणून अर्जदार श्री.शांताराम रामा भगत यांनी कै.शिमगी रामा भगत यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्री.शांताराम रामा भगत यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की,

जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.११/०८/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदाराचे वकील ॲड.सलमान पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९३०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०९/२०२१

१) श्रीमती.आयशा अ.रज्जाक तिधारे
२) मसुदा अ.रज्जाक तिधारे लग्नानंतर
श्रीमती.मसुदा म.रियाज पटेल
३) ताहिरा अ.रज्जाक तिधारे लग्नानंतर
श्रीमती.ताहिरा खालिद कर्मुळे
४) श्री.साजिद अ.रज्जाक तिधारे
५) श्री.जुनेद अ.रज्जाक तिधारे
सर्व रा.तळोजा गाव, बाजारपेठ, तीन बत्ती नाका,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ चे वडील पै.अ.रज्जाक अ.कादीर तिधारे हे दि.२०/०६/२०१९ के.जे.सोमया हॉस्पिटल मुंबई येथे मयत झालेले आहेत. पै.अ.रज्जाक अ.कादीर तिधारे यांची आई पै.हवाबी अ.कादीर तिधारे ह्या दि.२२/०६/१९९२ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, बाजार पेठ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८ येथे राहत्या घरी मयत झाली आहे. तसेच पै.अ.रज्जाक अ.कादीर तिधारे यांची सहहिस्सेदारांबरोबर मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील त्यांचे मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती / शेतजमिनी होत्या.

| अ.क्र. | मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पेंधर | १७ | १५५ | २ | ०-४७-३ | ७.६९ |
| २ | पेंधर | १७ | १५८ | ४ | ०-६७-०० | ४.७५ |
| ३ | पेंधर | १७ | १५५ | ६ | ०-०७-०६ | १.२५ |
| ४ | पेंधर | १७ | १५५ | ५ | ०-४३-०२ | ६.९४ |
| ५ | पेंधर | १७ | १५५ | ४ | ०-११-०९ | १.८१ |

मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत. सबब सदर संपादीत मिळकतीबाबत पै.अ.रज्जाक अ.कादीर तिधारे यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१२/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.एकनाथ विठ्ठल गायकर यांनी खालील वर्णनाची मिळकत / भूखंड आमचे अशिलांचा मुलगे १) श्री.भुपेंद्र एकनाथ गायकर, २) श्री.प्रवीण एकनाथ गायकर यांना बक्षिस पत्राद्वारे द्यावयाचे ठरविलेले आहे. सदर मिळकती / भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे...

**मिळकतीचे वर्णन**

**नोड : पुष्पक / वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट के. क्र. | सर्व्हेक्षणानुसार बांधकाम क्र. | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| VOV-ICIG-105 | VO NO-97 | पुष्पक/ वडघर | ०१ | ९५ | २२० चौ.मी. |

तरी सदरचे मिळकती / भूखंडावर कोणतीही व्यक्ती / राज्य शासकीय विभाग / संस्था / कामगार / मजूर / बँक / प्रायव्हेट फर्म, यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, थकबाकी अथवा अधिकार हे वारसहक्क, गहाणखत, दानपत्र / बक्षिसपत्र, खरेदीखत, भाडेपट्टा, भाडेकरार, (लिव्ह ॲण्ड लायसन्स ॲग्रीमेंट) याद्वारे असल्यास किंवा कोणतीही कोर्ट केस अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, थकबाकी अथवा अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सर्व लेखी कागदोपत्री पुराव्यासहीत खालील नमूद केलेल्या वकीलांकडे कळवावे अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही असे समजून बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**सही/-**
**ॲड.कैलास नारायण घरत**
**शॉप नं.३, नित्यानंद अपार्टमेंट,**
**देवधरवाडा, (प्रभुआळी), आदर्श**
**हॉटेल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९५९४६५३७७७**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : गावठाण व बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली गाव : गावठाण येथील मिळकत गणेश पुंडलिक भोळे व गाव : बेलोंडाखार येथील मिळकत व्योमेश महिपतराय शाह यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन**

**मौजे : गाव : गावठाण, ता.उरण, जि.रायगड येथील गणेश पुंडलिक भोळे यांची मिळकत**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मौजे : गाव : गावठाण, ता.उरण, जि.रायगड | ५/१६ | ०-०६-००<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण ०-०७-०० | ०.१२ |

**ब) मिळकतीचे वर्णन**

**मौजे : गाव : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड येथील व्योमेश महिपतराय शाह यांची मिळकत**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मौजे : गाव : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड | १०६/११ | ०-१८-९०<br>पो.ख.०-००-८०<br>एकूण ०-१९-७० | २.४४ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१३/०८/२०२१

**सही/-**
**कनू एम.ठक्कर**
**७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई-४०००७७**
**मो.नं.९३२२५५१४१४**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रायगड जिल्हयामध्ये आजादी का अमृत महोत्सव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजादी का अमृत महोत्सव' चे औचित्य साधून संयुक्त सक्रिय कुष्ठरुग्ण, क्षयरुग्ण शोध व नियमित संनियंत्रण २०२१-२२ मध्ये राबविण्यात येत आहे. या सर्वेक्षणामध्ये आशा, पुरुष स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी भेटी देऊन घरातील प्रत्येक व्यक्तींची तपासणी करणार आहेत.

संपूर्ण रायगड जिल्हयामध्ये आजादी का अमृत महोत्सव चे औचित्य साधून संयुक्त सक्रिय कुष्ठरुग्ण, क्षयरुग्ण शोध व नियमित संनियंत्रण सर्वेक्षण हे अतिजोखिम भागामध्ये १ जुलै २०२१ ते ३० ऑक्टोंबर २०२१ प्रथम फेरी व १ डिसेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ द्वितीय फेरी तर कमी जोखिम भागामध्ये १ जुलै २०२१ ते ३१ मार्च २०२२ एकच फेरी राबविण्यात येणार आहे. यानुसार अतिजोखिम तालुक्यामध्ये वर्षामध्ये दोन फेऱ्या व कमी जोखिम असलेल्या भागामध्ये एक फेरी घेण्यात येणार आहे. अलिबाग, पोलादपूर व तळा हे कमी जोखिम असलेले तालुके असून उर्वरित तालुके हे अतिजोखिमीचे तालुके आहेत. या सर्वेक्षणामध्ये ग्रामीण भागातील १००% लोकसंख्या व शहरी भागातील निवडलेली ३०% लोकसंख्येची १००% तपासणी करण्यात येणार आहे. सर्वेक्षण कालावधीमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करुन संयुक्त सक्रिय कुष्ठरुग्ण, क्षयरुग्ण शोध व नियमित संनियंत्रण सर्वेक्षणाची माहिती सर्व लोंकापर्यंत पोहचविण्यात येत आहे. या सर्वेक्षणामध्ये आशा, पुरुष स्वयंसेवक व आरोग्य कर्मचारी घरोघरी भेटी देऊन घरातील प्रत्येक व्यक्तींची तपासणी करणार आहेत. २०,५१,६५४ व्यक्तींची तपासणी एकूण ३०२८ आशा व स्वंयसेवक यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.

# वरंध घाटाच्या सततच्या पडझडीनंतर पोलादपूर कापडे कामथे पुणे घाटाच्या निर्मितीसाठी प्रयत्न आवश्यक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कापडे ते कामथे रस्त्याचे काम ६ वर्षापूर्वीच पूर्ण झाल्यानंतर पहिल्याच पावसाळ्यात रस्त्याची दूरवस्था झाली. आता जागोजागी हा रस्ता उखडला असताना त्याची दुरूस्ती ठेकेदाराच्या अनामत रक्कमेतून करण्याच्या नोटीसा संबंधित ठेकेदारास प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अभियंत्यांनी बजावल्या आहेत. हे काम पूर्ण झाल्यानंतर येत्या काही वर्षांमध्ये राज्य व केंद्रसरकारच्या माध्यमातून पोलादपूर कापडे कामथे पुणे घाटाची स्वप्नपूर्ती २०२१ सालापर्यंत शक्य असल्याची माहिती माहितीचा अधिकार कार्यकर्ते रमेश मालुसरे यांनी दिली होती. मात्र, राज्यसरकार नेहमीच कोसळणाऱ्या वरंध घाटावर सातत्याने खर्च करीत असल्याने नवीन घाटाची निर्मिती करण्याकडे सपशेल दूर्लक्ष झाल्याचे आरटीआय कार्यकर्ते रमेश मालुसरे यांनी खेदपूर्वक मत व्यक्त केले आहे.



१२ वर्षांपूर्वी कापडे कामथे या रस्त्यावरून पितळवाडीपर्यंत नेताना गर्भवती महिला रस्त्यातील खड्ड्यांमुळे वाहनातच बाळंतीण होत असत तर कधी आजारी माणसं उपचाराला नेताना वाटेतच मयत होत असत आणि मोटारसायकली, बैलगाड्यांची चाकं, एस.टी. च्या गाड्या नादुरूस्त होण्याचे प्रकार नेहमीचेच ठरले होते, असा अनुभव सांगणारे रमेश मालुसरे यांनी आपल्या पाठपुराव्यानंतर आता तब्बल तीन वेळा कोट्यवधी रूपये खर्च होऊनही निकृष्ट कामामुळे हिच अवस्था ओढवणार असल्यास पुढील कामथे घाटाच्या पाठपुराव्यात यश येऊनही ते दृष्टीपथाआड जाण्याची शक्यता व्यक्त केली आहे. मुंबईत नोकरी करून गावी चिखली येथे भाडोत्री वाहनाने येताना कापडे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नादुरूस्त झालेल्या वाहनामध्ये तब्बल दहा तासांहून अधिक काळ अडकल्याने १६ नोव्हेंबर २००२ पासून कापडे कामथे रस्त्यासाठी पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा करणारे रमेश मालुसरे यांना २००५ नंतर माहितीचा अधिकाराचा आधार मिळाला. त्यामुळे या रस्त्याच्या कामाबाबत पाठपुरावा करण्याचे सामान्य माणसाचे प्रयत्न असामान्य ठरू लागले आहे.


या कापडे ते कामथे रस्त्यामुळे कापडे बुद्रुकच्या १२ वाड्या, वाकणच्या १२ वाड्या, साखर, आडावळे बुद्रुक, मोरसडे, बोरघर, कामथे या सात गावांचा थेट तर रानवडी, घागरकोंड, बोरावळे, नाणेघोळ, केवनाळे, बोरज, उमरठ, चांदके, ढवळे, आडावळे खुर्द, चिखली, सडे, नावाळे, वडघर, चांदले, साळवीकोंड, गोवेले, खांडज, देवळे, हळदुळे, दाभिळ, लहुळसे व करंजे ही २३ गावे अशी ३० गावांची १९ हजारांहून अधिक लोकसंख्या मूळ रस्त्याला जोडली गेली आहे. त्यामुळे तालुक्याच्या अर्ध्याअधिक लोकसंख्येला मिळालेला हा रस्ता केवळ तालुक्याच्या किंवा बाजाराच्या गावापर्यंत पोहोचविण्यापुरताच न राहता पुणे जिल्ह्याला जोडण्यात यावा आणि येथील शेतीमाल विक्री तसेच सुशिक्षितांना पुणे शहर परिसरामध्ये रोजगार संधी मिळावी, या अपेक्षेने रमेश मालुसरे यांनी माहितीच्या अधिकारामध्ये २०१० पासून केलेल्या पाठपुराव्याला यश येऊन कामथे घाटाचा समावेश करण्यात येऊन २००१ ते २०२१ पर्यंतच्या यादीमध्ये कामथे ते पुणे जिल्हाहद्द रस्ता क्र. १६६ असा प्रस्तावित करण्यात आला आहे.

अलिकडेच, सातत्याने वरंध घाटाची पडझड होत असताना राज्यसरकार याच घाटाच्या दुरूस्तीवर अधिक भर देत असून वरंध घाटरस्त्यावर ग्रामपंचायत कनेक्टिव्हीटीसाठी अंडरग्राऊंड ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याचे काम दरीबाजूच्या साईडपट्टीवरून झाल्यामुळे सातत्याने ही वरंध भोर घाटाची पडझड होत राहणार असल्याची लक्षण दिसून येत आहेत. यामुळे पोलादपूर, कापडे ते कामथे हा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचा रस्ता सक्षम बनविण्यासाठी अलिकडेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला असून सर्व पुलांचे बांधकाम नव्याने करण्याची निविदादेखील निघाली आहे. कामथे ते पुणे या जिल्हाहद्द रस्ता क्र. १६६चे कामदेखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जोडूनच सुरू केल्यास पोलादपूर तालुक्यातूनच अल्पावधीमध्ये पुणे जिल्हाहद्दीपर्यंत नवीन रस्ता अस्तित्वात येण्याचे नियोजन आरटीआय कार्यकर्ते रमेश मालुसरे यांच्या पाठपुराव्यामुळे तत्कालील सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांनी २०२१ पर्यंत पूर्तता करण्यासाठी दिले होते. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कापडे ते कामथे हा रस्ता उखडला असताना त्याची सक्षमतेने दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्ता वर्ग झाला असल्याने शक्य असून त्यापुढील पोलादपूर कापडे कामथे पुणे घाटाची स्वप्नपूर्ती २०२१ सालापर्यंत शक्य आहे, असा विश्वास रमेश मालुसरे यांनी व्यक्त केला आहे.

# नात्याच बधन दृढ करणारी राखीही महागाईच्या फेऱ्यात

**दै.रायगड नगरी । उरण**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने सध्या बाजारपेठांमध्ये राखी आणि विविध वस्तू खरेदी करण्यासाठी गर्दी होत आहे. मात्र बहिण-भावाच्या नाते दृढ करणारी राखीही यंदा महागाईच्या फेऱ्यात अडकली आहे. गतवर्षी १० ते १५ रुपयांना असणारी राखी यंदा २० ते २५ रुपयांवर किंमत गेली आहे. बाजारपेठेत पारंपरिक गोंड्याच्या राख्याऐवजी डोरेमन, छोटा भीम, लायटिंगच्या राख्यांची क्रेझ आहे. याशिवाय रेशीम धागे व चंदन राख्या, मोती ,रुद्राक्ष ,सुंदर व आकर्षक राख्यांसह अनेक रंग आणि डिझाईनमध्ये राख्यांचे असंख्य प्रकार बाजारात दिसून येत आहेत.



शहरातील सराफा बाजारातही चांदी आणि सोन्याच्या मुलामा दिलेल्या राख्या उपलब्ध आहेत.उरण शहरात बाजार पेठ रंगीराख्यांनी सजली आहे. बहिण आपल्या लाडक्याभावा साठीकोणती सुंदर व आकर्षक राखी आवडेल त्याकडे लक्ष देऊन राख्या खरेदी करतांना दिसत आहेत .भारतीय डाक विभागाच्या वतीने राखी विशेष असा सेप्रेट व्यवस्था करण्यात आली आहे. वेगळी व्यवस्था केल्याने राखी पोस्टाने पाठविण्यात त्रास होत नाही.

बहिण भावाच्या अतूट नात्यांना रेशीम धाग्यांनी जोडणार सण म्हणजे रक्षाबंधन. महिलांसाठी हा सण म्हणजे भावनिक जपणूक ओलावा देणार आहे. सध्या ब्रेसलेट सारख्या राख्यांना बाजारात मोठी मागणी आहे. १० ते १५ रुपयांपर्यंत असणाऱ्या राज्या आता २० ते २५ रुपयांवर पोचल्या आहेत.सध्या बाजारात आलेल्या राख्या गुजरात आणि सुरत येथून उपलब्ध झाल्या आहेत. राख्यांचे विविध प्रकार,विविध आकार आहेत. दिवसेंदिवस नव-नवीन वस्तूंचे प्रकार मार्केटमध्ये उपलब्ध होत आहेत.

कपडे, ज्वेलरी, कॉस्मेटिक्स आणि इतर ऑनलाइन शॉपिराच्या जमान्यात आता इंटरनेटवर राख्यांची बाजारपेठही सजली आहे. ऑनलाइन राख्या आणि गिफ्टच्या खरेदीला युवा ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. पूर्वी महिनाभर आधीपासून बाजारपेठेतील दुकाने पालथी घालून लाडक्या भावासाठी बहिण मनासारखी राखी मिळेपर्यंत पायपीट करीत असतांना बाजरपेठेत दिसत आहेत.

आता ऑनलाइनच्या जमान्यातील बाजारपेठही व्यापक झाली आहे. खडे, मोती, गोंडा, रेशीम धागा, प्लॅस्टिकची फुले, मॉडर्न डिझाईन, आणि मॉडर्न लुक असलेल्या असंख्य राख्या ऑनलाइन बाजारपेठेत उपलब्ध आहेत. दोनशे रुपयापासून तीन हजार आणि यापेक्षाही अधिक किमतीच्या राख्या विक्रीसाठी आहे. मोरपीस, अमेरिकन डायमंड चादी, गोल्ड प्लेटेड, वुडन असे अनेक प्रकार यामध्ये उपलब्ध आहे.

## ऑक्सिमिटर व थर्मामीटर तसेच शैक्षणिक साहित्याची भेट

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी-राजखलाटी या विद्यालयास ऑक्सिमिटर व थर्मामीटर तसेच शैक्षणिक साहित्य भेट देण्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते समीर मराठे,सुधीर मराठे,व रोशन बारस्कर यांच्याकडून सदरचे साहित्य विद्यालयास देण्यात आले असून यावेळी मुख्याध्यापक अनिल खांडेकर, सहा.शिक्षक गौतम जाधव, शिल्पा मरवडे, अर्चना मरवडे, सुप्रिया जाधव, ऋषीकेश महाडिक, सुजित लोखंडे, नितेश पोटफोडे आदी उपस्थित होते.

# तळा कृषी विभागाच्या वतीने रानभाज्याचे प्रदर्शन

**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने रानभाज्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

आयुर्वेदात आहारात रान भाज्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे या रानटी औषधी वनस्पतीचा आहारामध्ये महत्त्व वाढावे तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर माणसाचीरोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी अधिक महत्त्व प्राप्त झाले पाहिजे. या दृष्टीने राज्याचे कृषी मंत्री मा.दादा साहेब भुसे यांच्या संकल्पनेतून रानभाज्याचे महत्व पौष्टिक औषधी गुणधर्म विचारात घेऊन जनजागृती लोकांपर्यंत अधिकाधिक पोहोचावी. तसेच अँलोपेथीक औषधे निर्मिती आयुर्वेदिक वनस्पती पासूनच होते यादृष्टीने कृषी विभागाच्या वतीने तळा एस् टी स्टँड मध्ये रानभाज्याचा महोत्सवाचे आयोजन १२ आँगस्ट रोजी करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन सभापती पं.स.अक्षरा कदम माजी पं स. सभापती तथा सदस्य देवकी लासे तळा नगराध्यक्षा रेश्मा मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले याच्या उपस्थीतीत करण्यात आले. या महोत्सवात भारंग, कुडा, अळु, माठ, दिंडी, कल्याणी आळू, कंटोली, सुरण, तुळस कढीपत्ता तेरी टाकळा वगैरे ३०/३५ प्रकारच्या रानटी भाज्या ठेवण्यात



आल्या होत्या. यामध्ये प्रगतीशील शेतकरी मधूकर वारंगे, महम्मद परदेशी, यांनी सहभाग घेतला होता. या महोसत्वाला अनेक मान्यवर व्यक्तीनी, आयुर्वेद प्रेमींनी भेटी देऊन शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी तालुका कृषी अधिकारी तथा मंडल अधिकारी सागर वाडकर व क्षेत्रीयअधिकारी, पर्यवेक्षक, वर्ग उपस्थित होते.

---

मा.राव साहेब

वकील श्रीमती.एस.आर.महारनवर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.५९७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२१

१) श्रीमती.पुष्पा कापूराराम कुमावत
(मयताची पत्नी) वय : ४३ वर्षे, भारतीय
स्वतःसाठी आणि आई तसेच कायदेशीर व नैसर्गिक पालक
या नात्याने अर्जदार २,३ व ४ च्या वतीने पालनकर्ती
२) कु.सुप्रिया कापूराराम कुमावत
(मयताची मुलगी) वय : १३ वर्षे, भारतीय
३) कु.नरेंद्र कापूराराम कुमावत
(मयताचा मुलगा) वय : ११ वर्षे, भारतीय
४) कु.प्रशांत कापूराराम कुमावत
(मयताचा मुलगा) वय : ७ वर्षे, भारतीय
अर्जदार क्र.२,३ व ४ च्या वतीने आई तसेच कायदेशीर
व नैसर्गिक पालक या नात्याने
वरील सर्व रा.फ्लॅट नं.३०३, EWS टाईप बिल्डींग नं.१३,
स्वप्नपूर्ती सीएचएस लि., सेक्टर ३६,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.पुनकीबाई सोमाराम कुमावत
(मयताची आई) वय : वर्षे, भारतीय
फ्लॅट नं.३०३, EWS टाईप बिल्डींग नं.१३,
स्वप्नपूर्ती सीएचएस लि., सेक्टर ३६,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

अर्जदार नं.१ यांचे पती कै.श्री.कापूराराम सोमाराम कुमावत यांचे दि.२४/०५/२०२० रोजी बांगड सरकारी हॉस्पिटल, ता.जि.पाली, राजस्थान, राज्य : राजस्थान येथे निधन झाले. मयत कै.श्री.कापूराराम सोमाराम कुमावत यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

FLAT NO.303, EWS TYPE BUILDING NO.13,
SWAPNAPURTI CHS LTD., SECTOR 36, KHARGHAR,
TAL-PANVEL, DIST-RAIGAD.
ADMEASURING 28.630 SQ.MTRS.,
VALUE OF PROPERTY IS 18,50,000/-

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारास या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.एम.जे.पाटील/ॲड.अंकिता पवार

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१०३२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/१०/२०२१

१) श्री.साहिल संजय पाटील
वय : २२ वर्षे, धंदा : शेती
२) कु.कौशिक संजय पाटील
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.आयुष संजय पाटील
वय : ०३ वर्षे, धंदा : काहीही नाही
४) श्रीमती.कविता संजय पाटील
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.४ स्वतःकरिता व अर्जदार क्र.३ यांची
अ.पा.क.आई म्हणून
५) सौ.अनुसया रामदास पाटील
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

१) अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ हिचे पती व अर्जदार क्र.५ हिचा मुलगा कै.संजय रामदास पाटील हे एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.१९/०६/२०२० रोजी मरण पावले. अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

२) मृत्यूसमयी कै.संजय रामदास पाटील यांच्या नावे मौजे : तोंडरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड पनवेल महानगरपालिका प्रभाग नावडे (तोंडरे) हद्दीत खालील वर्णनाची घर मिळकत होती. त्याचे पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | घर/मिळकत क्रमांक | क्षेत्रफळ चौ.फु/चौ.मी. | किंमत रु. |
|---|---|---|---|
| मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड | घर क्र.८०२<br>घर क्र.५७७ ड | ६००/५५.७६<br>५५५/५१.५७ | रु.७,४६,५१४/-<br>रु.६,१३,६८३/- |
| | | एकूण किंमत | रु.१३,६०,१९७/- |

वरील मिळकत ही मयत कै.संजय रामदास पाटील यांची होती. आता ती अर्जदारास त्याच्या नावे करायची आहे. म्हणून पनवेल महानगरपालिका नावडे प्रभाग (तोंडरे) ऑथरिटीने मे.कोर्टाकडून वारस दाखला मागितला आहे. म्हणून अर्जदार मे.कोर्टात वारस दाखला मिळणेकरिता हा अर्ज करीत आहेत. ज्या कुणाही व्यक्तीला या बाबतीत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात १ महिन्याच्या आत हजर राहून किंवा वकीलामार्फत हरकत घ्यायची आहे. योग्य मुदतीत हरकत आली नाही तर मे.कोर्ट हक्काबद्दल पुरावा घेण्याची कारवाई करेल आणि जर अर्जदार हे कै.संजय रामदास पाटील यांचे वारस आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१२/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मे.मुजावर सो.

ॲड.नरेश टी. म्हसकर
(पनवेल)

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७०९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०९/२०२१

१) श्री.अरुण पंढरीनाथ म्हात्रे
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.किरण पंढरीनाथ म्हात्रे
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.लक्ष्मीबाई पंढरीनाथ म्हात्रे
वय : ७२ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ यांचे वडील व अर्जदार नं.३ यांचे पती कै.पंढरीनाथ बनूजी उर्फ बनू म्हात्रे हे दिनांक ३१/१२/२०२० रोजी सुरज हॉस्पिटल, सानपाडा, नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.पंढरीनाथ बनूजी उर्फ बनू म्हात्रे यांची आई कै.शांताबाई बनूजी उर्फ बनू म्हात्रे ह्या देखील फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. कै.पंढरीनाथ बनूजी उर्फ बनू म्हात्रे यांचे सामाईक मालकीच्या मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकती ह्या सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल | ४३१ सी | ५४८ | १ | ०-७२-९ | ६.५७ |
| २ | पनवेल | ४३१ सी | ५५६ | १ | ०-५०-७ | ५.३१ |
| ३ | पनवेल | २४० | ५५६ | १० पै | ०-१८-२ | १.४१ |
| ४ | पनवेल | २१ | ९२ | ४ | ०-०६-६ | १.३६ |
| ५ | पनवेल | २१ | ८९ | ४ | ०-१२-१ | २.२० |
| ६ | पनवेल | २२ | ५९१ | ३ | ०-०५-३<br>पो.ख.०-०१-८ | ०.८४ |
| ७ | पनवेल | २२ | ६०२ | ३ | ०-०३-१<br>पो.ख.०-००-२ | ०.४७ |
| ८ | पनवेल | २२ | ५६७ | ६ | ०-१९-९<br>पो.ख.०-०१-३ | ४.७५ |
| ९ | पनवेल | २२ | ५१७ | ५ | ०-०३-१<br>पो.ख.०-००-२ | ०.५३ |
| १० | पनवेल | २१ | ५५६ | ८ | ०-१६-२ | १.६९ |
| ११ | पनवेल | ४३६ | ५४८ | ७ पै | ०-११-५ | १.०६ |
| १२ | पनवेल | - | ५७० | १ | ०-११-३०<br>पो.ख.०-०१-३० | २.८१ |
| १३ | पनवेल | - | ५७१ | ४ | ०-०२-००<br>पो.ख.०-००-५० | ०.४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे. वरील मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याने सदर मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.११/०८/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
सौ.सारिका शेगट/लबडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.९३२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०९/२०२१

१) श्री.राम नारायण कोंडीलकर
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
२) श्री.काशिनाथ नारायण कोंडीलकर
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी / शेती
३) श्रीमती.लक्ष्मी कृष्णा कोंडीलकर
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
४) कु.प्रणीत कृष्णा कोंडीलकर
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
५) कु.रिया कृष्णा कोंडीलकर
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
(अर्जदार क्र.४ व ५ तर्फे अ.पा.क.आई
श्रीमती.लक्ष्मी कृष्णा कोंडीलकर)
१ ते ५ रा.मु.कासप, पो.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.पल्लवी भालचंद्र मोरे
पुर्वाश्रमीची मंजुळ नारायण कोंडीलकर
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.दुश्मी, पो.जिते, ता.पेण, जि.रायगड अर्जदार

अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार वारस दाखला मिळणेकरिता...

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, १) ज्याअर्थी अर्जदार नं.१, २ व ६ यांचे वडील कै.नारायण पदू कोंडीलकर हे दि.०७/०३/२००८ रोजी मरण पावले असून त्यांची पत्नी व अर्जदार नं.१, २ व ६ यांची आई कै.भिमा नारायण कोंडीलकर ही दि.१३/०९/२०१९ रोजी मरण पावली आहे. तसेच अर्जदार नं.१, २ व ६ यांचा भाऊ तसेच अर्जदार नं.३ चे पती व अर्जदार नं.४ आणि ५ चे वडल तसेच मयत नारायण पदू कोंडीलकर व भिमा नारायण कोंडीलकर यांचा मुलगा कृष्णा नारायण कोंडीलकर हा दि.२३/०५/२०१० रोजी मरण पावला आहे. व ज्याअर्थी सदर मयत नारायण पदू कोंडीलकर यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी. करिता ॲक्वीझिशन केस नं.LAQ/SR-3 अन्वये संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**

**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १९ | २ अ | ०-१९-७ | १५,६७६=५३ |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत नारायण पदू कोंडीलकर यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत नारायण पदू कोंडीलकर यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सार करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.११ माहे ०८ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मुलीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुलीचा हात पकडून तु मला खुप आवडतेस असे बोलून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी कामोठे पोलिसांनी तिघा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका मुलीचा वारंवार पाठलाग करून तिच्याकडे चुंबन मागून व हे सर्व घराच्यांना सांगितलेस तर तुला मारेल अशी धमकी देवून तसेच त्या मुलीचा हात पकडून तु मला आवडतेस असे बोलून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी कामोठे पोलिसांनी राजेश तुरिया, अरविंदकुमार रविदारा व पप्पू तुरिया या तिघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## आता मोबाईल ॲपद्वारे शेतकरी करणार ई-पीक पाहणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

शेतकरी आपल्या शेतजमिनीच्या उताऱ्यांवर (७/१२ ) पिकांची नोंद करण्याची ही पद्धत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन, शेत जमिनीची प्रतवारी, दुष्काळ, अतिवृष्टी किंवा वादळामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज लावणे शक्य होते. या पीक नोंदणीच्या आधारे शेतकऱ्यांना पीक कर्जही दिले जाते. मात्र दोन तीन गावांमध्ये मिळून एकच तलाठी असल्याने पीक पाहणी अचूक नोंदवली जात नाही, असा शेतकऱ्यांचा कायम आक्षेप होता. ही बाब लक्षात घेत आता महसूल विभागाने आपल्या पिकाची रिअल टाइम नोंदणी करण्याची सुविधा थेट शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. महसूल विभागाने यासाठी स्वतंत्र मोबाइल ॲप्लिकेशन निर्मिती केली असल्याने शेतकऱ्याना आपल्या शेतीतील पीक पाहणी जलद,वस्तुनिष्ठ व पारदर्शी होण्यास मदत होईल, शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या असणाऱ्या ७/१२ वर तो घेत असलेल्या पिकांच्या नोंदी असणे आवश्यक असते. सद्य:स्थितीत गाव नमुना १२ वर तलाठ्यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पाहणी करून पिकांची नोंद केली जाते. आता शेतकरीच आपल्या पिकाची नोंद या पव्दारे करु शकणार आहेत. टाटा ट्रस्टच्या सहाय्याने या पची निर्मिती करण्यात आली आहे. या मोबाइल प्लिकेशनमध्ये शेतकरी पिकांची माहिती भरतील, तलाठी या पिकांच्या नोंदी तपासून घेतील. यामुळे पीक पेरणीची रियल टाइम माहिती ॲप्लिकेशनमध्ये संकलित होणार आहे. तसेच ही माहिती संकलित होताना पारदर्शकता येणार आहे. महसूल विभागाचा ई–पीक पाहणी पालघर (वाडा) नाशिक (दिंडोरी), औरांगाबाद (फु लांब्री) नागपूर ( कामाठी), पुणे (बारामती), अमरावती (अचलपूर) परभणी (सेलू ), औरांगाबाद ( सिल्लोड), अहमदनगर (संगमनेर), व बीड जिल्ह्यांतील ११ तालुक्यातून असे १० जिल्हे व २० तालुक्यातून मागील वर्षापासून पथदर्शी कार्यक्रम सुरू आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# कळंबोली लोखंड बाजारात चिखलाचे साम्राज्य ; व्यापारी व माथाडी कामगारांचे हाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजारा–तील नव्याने बांधलेल्या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे येथील व्यापारी व माथाडी कामगारांचे हाल होताना दिसत आहे. हा बाजार आशिया खंडातील सर्वात मोठा बाजार आहे. परंतु पायाभूत सुविधा भावी या बाजाराची दुरावस्था झाली आहे.



कळंबोली येथे ३०२ हेक्टर क्षेत्रावर उभ्या असलेल्या लोखंड पोलाद बाजारातील काही ठिकाणी अंतर्गत रस्त्याची कामे झाली आहेत तर बऱ्याच ठिकाणचे रस्ते पाण्याखाली गेलेले आहेत. बाजारपेठेमधील रस्ते चिखलाने माखले असल्याने या ठिकाणी मालाची चढ उतार करण्यासाठी आलेल्या माथाडी कामगारांना चिखलातून वाट काढावी लागत आहे. त्यामुळे येथील माथाडी कामगार व व्यापार्यांचे प्रतिनिधी यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्मान झाला आहे. तसेच वाहनांना पाण्याचा अंदाज न आल्याने चिखल मातीतून रस्त्यावर कसरत करावी लागत आहे. काही ठिकाणी रस्त्यावर तीन ते चार फूट पाणी असल्यामुळे छोट्या गाड्या पूर्ण चिखल पाण्यात रुतून बसतात त्यामुळे वाहतूक कोंडी चे समस्या या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे.

तर व्यापारी पावसाळ्यामध्ये स्टील मार्केटमध्ये येण्यास टाळाटाळ करतात. लोखंड बाजार समितीला वेळोवेळी कर भरूनही सुविधा मिळत नसल्यामुळे या ठिकाणचे व्यापारी व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्टील मार्केट मधील बाहेरच्या स्त्यांची कामे झाली असली तरी अंतर्गत रस्त्यांची कामे रखडल्यामुळे माथाडी कामगार वाहतूकदार व व्यापाऱ्यांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या अंतर्गत रस्त्याची कामे त्वरीत करावीत अशी मागणी माथाडी कामगारांचे नेते व शिवसेना पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांच्या केली आहे.

यावेळी डॉ.केदारी जाधव म्हणाले की, कळंबोली लोखंड पोलाद बाजार समितीमधील महत्त्वाचे रस्ते लोखंड पोलाद बाजार समितीने बनवलेले आहेत. बाजार समितीमधील अंतर्गत रस्ते बनवण्यासाठी एफ आय डी फंडाचे आवश्यकता आहे. येथील गोडावून धारकांनी गोडाऊन च्या क्षेत्रफळाच्या प्रमाणात ४० ते ५० टक्के रक्कम जमा केली तर लोखंड पोलाद बाजार समिती उर्वरित रक्कम भरून हे रस्ते बनवणार आहे. त्यासाठी येथील गोडाऊन धारकांना तशा सूचना देऊन नोटीस काढण्यात आलेल्या आहेत. बाजारातील अंतर्गत रस्ते बनवण्याच्या दृष्टीने लोखंड पोलाद बाजार समिती सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आणि लवकरात लवकर हे काम होऊन बाजार समितीचे रूपडे पालटले दिसणार आहे.

## पेण तालुक्यात कोरोना रुग्ण संख्या घटली ; मृतांमध्येही मोठी घसरण

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्रातील सात जिल्ह्यासह रायगड जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याने सरकारने याठिकाणी लॉकडाऊनचे नियम आजही कायम ठेवले आहेत. मात्र मागच्या काही दिवसांपासून जिल्ह्यासह पेण तालुक्यात कोरोना रुग्ण संख्या घटत चालली असून मृतांची संख्याही कमी होत आहे. पेण मधील निर्बंध लवकरच उठविण्यात यावे याचीच वाट आता व्यापारी वर्ग पाहत आहेत. पेण तालुक्यात २०२१ च्या सुरूवाती पासून चार पाच महिने कोरोना रुग्ण संख्या वाढत असल्याने भयानक परिस्थिती निर्माण झाली होती. एका दिवसात रुग्ण संख्या १०० च्याही पुढे गेल्यामुळे संपूर्ण यंत्रणेची झोप उडाली होती. आतापर्यंत पेणच्या कोरोना रुग्णांची संख्या १२ हजारांच्या आसपास आली असून मृतांची संख्या ३०० च्या वर पोहचत आहे.

काही दिवसांपूर्वी निर्बंधांत शिथीलता आणल्याने नागरीकांकडून कोरोनाचे कोणतेही नियम पाळले जात नाहीत. त्यामुळे रोजच्या रोज बाजारपेठांमध्ये होणारी गर्दी पाहता पेण मध्ये कोरोना रुग्ण संख्या झपाट्याने वाढतांना दिसत होती. त्यात मृत्यूचे प्रमाणही वाढत होते. पण प्रशास–नाने पुन्हा लॉकडाऊनसह निर्बंध कडक करण्याचे संकेत दिल्या नंतर शहरासह तालुक्यातील कोरोना स्थिती सुधारली आहे. मागच्या महिन्यात पेण शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात कोरोनाचा आलेख वाढतांनाच दिसत होता. मात्र त्यानंतर कमालीची घट होत असल्याने तालुक्यातील आरोग्य प्रशासनावरचा ताण कमी झाला आहे. तर एकीकडे नागरीक तालुक्यातील वाशी, गडब, कामार्ली, जिते या चार उपकेद्रांसह उपजिल्हा रुग्णालयात लसीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत असल्याने ग्रामिण भागात वाढणारा कोरोना आता कमी प्रमाणावर येऊन थांबला आहे. बाजारात येताना मास्क, सामाजिक अंतर, सॅनिटायझर यांचा वारंवार वापर होत असल्याने येत्या काही दिवसांत पेण तालुक्यातील निर्बंध कायमचे शिथिल होतील असा अंदाज व्यापारी वर्गाला करत आहे.

## काशिद–सर्वे परीसरात आयडिया नॉटरिचेबल : ग्राहकवर्ग हैराण

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या पंधरा दिवसांपासून मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे, चिकणी परीसरात आयडिया मोबाईल नेटवर्क मिळत नसल्याने ग्राहकवर्ग हैराण झाला असून संबंधित कंपन्यांच्या गलथान कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे चिकणी परीसरात आयडिया मोबाईलला महागडे रिचार्ज भरुनही पुरेपूर इंटरनेट व नेटवर्क मिळत नसल्याने अनेक कामे खोळंबत असून संबंधित कंपन्यांच्या गलथान कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या भागातील ग्राहकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन संबंधित आयडिया कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने योग्य ती दखल घेऊन मोबाईल नेटवर्क व इंटरनेट सेवा पुरेपूर पुर्ववत व सुरळीत उपलब्ध करून देण्यात यावी. अशी मागणी ग्राहकवर्गातून केली जात आहे.

# कळंबोली मॅकडोनाल्ड समोरील बस थांब्यावरील स्वच्छता गृहाचे नुतनीकरण

### सायन पनवेल महामार्गावरील सर्वांत महत्त्वाचा बस थांबा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सायन पनवेल महामार्गावरील कळंबोली मॅकडोनाल्ड समोरील बस थांब्या जवळील स्वच्छतागृहाच्या नुतनीकरणाचे काम रस्ते विकास महामंडळाने हाती घेतले आहे.तर या स्वच्छता गृहांच्या साफसफाई चे काम पनवेल महापालिके मार्फत केले जाते.



मार्गावरील नेहमी हा गजबजलेला व महत्त्वाचा बस थांबा आहे. सायन पनवेल महामार्गावर याच ठिकाणाहून यशवंतराव चव्हाण मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग सुरू होतो. तसेच या मार्गावरील कळंबोली सर्कल येथून कोकण गोवा, न्हावा शेवा बंदर रोड, कल्याण, मुंब्रा, नाशिक हे मार्ग जातात, तसेच समोर या परिसरातील सर्वात मोठे एमजीएम हे हॉस्पिटल आहे. तसेच जवळच जवाहर इंडस्ट्रीज आहे. त्यामुळे या ठिकाणच्या बस थांब्यावर नेहमी वाटसरूंचा राबता असतो. या ठिकाणाहून दररोज शेकडो प्रवासी वाहणे व हजारो प्रवासी प्रवास करतात. परंतु या ठिकाणी प्रवाशांसाठी कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत.

स्वच्छता गृहांची दुरावस्था झाल्याने त्याचा वापर होत नव्हता, त्यामुळे प्रवासी रस्त्याच्या कडेला लघुशंका करत होते. त्यामुळे या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच या ठिकाणी एस टी च्या तोकड्या निवारा शेड शिवाय या ठिकाणी निवार नसल्याने ऊन वारा व पावसात प्रवाशांना ताटकळत उभे रहावे लागत आहे. येवढ्या मोठ्या रहदारीच्या ठिकाणी प्रशासनाने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली नाही. त्यामुळे या ठिकाणी प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण करण्यासाठी एमएसआरडीसी व पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा करणार असल्याचे पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांनी सांगितले आहे.

या ठिकाणी रस्ते विकास महामंडळाने स्वच्छतागृह बांधले आहे. परंतु या स्वच्छता गृहांची दुरावस्था झाली आहे. परंतु रस्ते विकास महामंडळाने स्वच्छता गृहांच्या डागडुजी चे काम हाती घेतल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

### जिल्हास्तरीय महसूल दिन साधेपणाने संपन्न...

# कु.साक्षी आयरेकर या निराधार विद्यार्थीनीच्या हस्ते गौरविण्यात आले उत्कृष्ट काम केलेल्या महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महसूल व वनविभाग यांच्याकडील शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावरील महसूली कामे वेळच्या वेळी पूर्ण करून त्यानुसार अभिलेख अद्यावत करणे, वसुलीच्या नोटीसा पाठविणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांचा निपटारा करणे इत्यादी कामे वेळेच्या वेळी व वेळापत्रकानुसार करणाऱ्या आणि महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याकरिता तसेच महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरीता दि. ०१ ऑगस्ट हा दिवस महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

तथापि, रायगड जिल्ह्यात दि. २१ व २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे व दरड कोसळल्यामुळे महाड व पोलादपूर तालुक्यांतील जनजीवन विस्कळीत झाले. मौजे तळीये, ता. महाड व ता. पोलादपूर येथे काही गावात दरड कोसळून जीवित व वित्तहानी झाली. या संवेदनशील कारणास्तव यावेळी जिल्हास्तरीय महसूल दिन दि.०६ ऑगस्ट २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात अतिशय साधेपणाने पार पाडला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के–पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र मठपती, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, उपविभागीय अधिकारी सर्वश्री दत्तात्रय नवले, विठ्ठल इनामदार, अमित शेडगे, प्रशांत ढगे, डॉ.यशवंत माने, श्रीमती प्रतिमा पुदलवाड, प्रशाली दिघावकर,वैशाली ठाकूर यांच्या तहसिलदार सतिश कदम, तहसिलदार विशाल दौंडकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस माहे जुलै, २०२१ मध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये प्राण गमावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम एसओएस चिल्ड्रन्स व्हिलेज, अलिबाग येथील कु.साक्षी आयरेकर या निराधार विद्यार्थीनीच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून कु.साक्षी आयरेकर यांनाच मान देण्यात आला. ही विद्यार्थीनी १२ वी सायन्स (झउच्) कक्षेत शिकत असून तिला सॉफ्टवेअर इंजिनिअरींगमध्ये बीटेक करण्याची इच्छा आहे.

कार्यक्रमाच्या वेळी करोना काळात व नैसर्गिक आपत्तीमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या पुढील महसूल अधिकारी/कर्मचाऱ्यांना कु.साक्षी आयरेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून पुरस्कृत करण्यात आले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

करोना काळात व नैसर्गिक आपत्तीमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेले महसूल अधिकारी/कर्मचारी :– उपविभागीय अधिकारी रोहा श्री.यशवंतराव वसंतराव माने, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली गंगाराम माने, तहसिलदार (महसूल) श्री.विशाल यशवंतराव दौंडकर, पनवेल तहसिलदार श्री. विजय शिवाजीराव तळेकर, तहसिलदार सुधागड श्री. दिलीप जक्काप्पा रायण्णावार, पोलादपूर नायब तहसिलदार श्री.समीर दिवाकर देसाई, उपविभागीय अधिकारी कार्यालय,पेण अव्वल कारकून श्रीम. साक्षी संतोष कवडे, तहसिल कार्यालय, महाड, मंडळ अधिकारी खरवली श्री. गोपाळ गोविंद पवार,उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल महसूल सहाय्यक श्रीम. स्वाती सुभाष सावंत, तहसिल कार्यालय, पोलादपूर तलाठी श्री.अशोक पांडुरंग बनसोडे, तहसिल कार्यालय, कर्जत तलाठी श्रीम. भूमिका भारत लदगे, तहसिल कार्यालय, श्रीवर्धन वाहनचालक श्री. अजय लक्ष्मण दाते, तहसिल कार्यालय, पेण शिपाई श्री. पांडुरंग यशवंत म्हात्रे, तहसिल कार्यालय,तळा कोतवाल श्री. किशोर चोगले,तहसिल कार्यालय, पोलादपूर पोलीस पाटील श्री. सुरेश रामचंद्र जंगम, तहसिल कार्यालय, मुरुड पोलिस पाटील श्री विश्वास भास्कर महाडीक.

# शिवसेना पनवेल शहर शाखेतर्फे महाड येथील पुरग्रस्तांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पनवेल शहर शाखेतर्फे महाड, पाचाड येथील सोंडे वाडी व निवळे वाडी येथे पुरग्रस्तांना सर्वोतोपरी मदत करण्यात आली.

महाड, चिपळूण, खेड येथे पुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे, त्यांना मदतीचा ओघ अजूनही सुरू आहे,

महाड येथील सोंडे वाडी व निवळे वाडी येथे मदतीची गरज असल्याचे तेथील संबंधित व्यक्तींकडून समजले असता याची



तातडीने दखल घेत पनवेल शहर शाखेतर्फे अन्न– धान्य व घरघुती सामानाचे १०० किट, त्याचबरोबर चादर, टॉवेल, चटई यांची मदत दोन्ही गावातील कुटुंबियांना करण्यात आली.

यासाठी शिवसेना शहर शाखेतर्फे शहर प्रमुख अच्युत मनोरे, उपशहरप्रमुख राहुल गोगटे, अनिल कुरघोडे यांनी विशेष मेहनत घेतली, यावेळी शिवसेना कार्यकर्ते अनिल फुलवरे , मोहसीन शेख उपस्थित होते.

## भाजप युवानेते अविनाश म्हात्रे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भारतीय जनता पक्षाचे युवानेते अविनाश लक्ष्मणशेठ म्हात्रे (पाटील )(नावडे, ता. पनवेल) यांचे बुधवारी (दि. ११) अल्पशा आजाराने निधन झाले. ते ४७ वर्षांचे होते. त्यांचे वडील ज्येष्ठ नेते लक्ष्मणशेठ यांचे ५ ऑगस्ट रोजी, तर आईचे १८ जुलै रोजी निधन झाले होते. या आघातामुळे त्यांच्या कुटुंबावर आणखी एक दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अविनाश म्हात्रे यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, आर. सी. घरत, नारायणशेठ ठाकूर, प्रवीण ठाकूर, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, नितीन पाटील, अभिमन्यू पाटील, हरेश केणी, बबन मुकादम, अरविंद म्हात्रे, नगरसेविका हेमलता म्हात्रे, भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, युवा नेते दशरथ म्हात्रे, प्रकाश खैरे, प्रमोद भिंगारकर, दिनेश खानावकर आदी उपस्थित होते. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मंडळींनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

कै. अविनाश म्हात्रे त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. काही दिवसांच्या अंतराने वडील, आई आणि मुलगा यांचे निधन झाल्याने नावडे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे

## आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमीपूजन सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील संभे येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन व उद्घाटन कार्यक्रम सोहळा आ.अनिकेत भाई तटकरे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आले.

या कार्यक्रमातंर्गत कोलाड–रोहा मुख्य रस्ताचे संभे अप्रोज रस्ता डांबरीकरण करणे ह्या कामाचे भूमिपूजन व प्रा.शाळेसमोर संरक्षण भिंत बांधणे ह्या कामाचे उद्घाटन कार्यक्रम सोहळा माननीय आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आले. यावेळी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा प्रितम पाटील, आंबेवाडी सरपंच जेष्ठ नेते सुरेश महाबळे, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष जयवंत मुंढे, गोवे ग्रा. पं.सरपंच महेंद्र पोटफोडे, खांबचे उपसरपंच मनोज शिर्के, नाना सानप, संतोष सानप, नारायण कडव तसेच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व संभे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमात सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान च्या वतीने संभे गावासाठी दिलेल्या संभेगावाच्या नावाचे पाटीचेही अनावरण आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

